- 8 MAR 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषा समृद्ध असेल तर टिकेलच

## डॉ. सुलभा ब्रम्हनाळकर यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भाषा ही उत्क्रांतीसारखी असते. समृद्ध असेल तर टिकेलच. भाषा कधी समृद्ध होणार, कधी अटणार कधी लोपही पावणार. यातून भाषेचे प्रवाहीपण मान्य करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कराड येथील डॉ. सुलभा ब्रम्हनाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि सावली केअर सेंटर यांच्या वतीने विद्यापीठाच्याराजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित 'आरोग्याची भाषा आणि भाषेचे आरोग्य' या विषयावरील परिसंवादामध्ये डॉ. ब्रम्हनाळकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

डॉ. ब्रम्हनाळकर म्हणाल्या, आजच्या मराठी भाषेपेक्षा इतिहासकालीन आणि ज्ञानेश्वरांच्या काळातील मराठी वेगळी होती. आताच्या, पिढीतील आजोबा, मुलगा आणि नातवाची मराठी वेगळी असते. त्यामुळे भाषा ही प्रवाही आहे. कोल्हापूर, सोलापूर, पुणे, नागपूर, कोकण येथील भाषा स्थळ, काळानुरूप बदलत असते. भाषा हे संवादाचे प्रमुख माध्यम आहे. त्यामुळे भाषेकडून खूपच अपेक्षा वाढलेल्या आहेत. भाषेकडे भावनिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक गरजा आहेत. त्या पूर्ण होत नसेल तर त्या जोडल्या जाणार नाहीत. मराठी भाषा टिकविण्यासाठी, समृद्ध होण्यासाठी सर्वांचे सामुदायिक प्रयत्न आवश्यक आहेत. जगामध्ये विपूल प्रमाणात सर्वच क्षेत्रांमध्ये इंग्रजीमधून लिखाण झालेले आहे. त्याचा अभ्यास करण्यासाठी इंग्रजी भाषा जाणणेही आवश्यक आहे. आज चीनमध्ये संपूर्ण वैद्यकीय शिक्षण चिनी भाषेत शिकविले जाते. त्यामुळे त्याचा सखोल अभ्यास करणे तेथील लोकांना सहज शक्य आहे.

### भाषा समृद्धीसाठी व्यावहारिक दृष्टिकोनाची गरज

*भारतामध्ये विविध भाषा बोलल्या जातात. जगामध्ये विस्तारलेले ज्ञान क्षेत्र कवेत घ्यावयाचे असेल तर जागतिक भाषा शिकणे आवश्यक आहे. भाषा समृद्ध करण्यासाठी तात्वीक चर्चेपेक्षा व्यावहारिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक असल्याचेही डॉ. ब्रम्हनाळकर यांनी सांगितले.*




डॉ. शिर्के म्हणाले, मराठी भाषेची वाढ होण्यासाठी सामूहीकरीत्या प्रयत्न होणे गरजेचे आहे. घरामध्ये मराठी भाषा बोलणे ही आपली सांघिक जबाबदारी असली तरी मराठी भाषा वृद्धिंगत करणे ही वैयक्तीक जबाबदारी जास्त आहे. मराठी या व्यक्तिमत्त्वाला इंग्रजीचा मुलामा देणे घातक आहे. मराठीचे आरोग्य सांभाळणे हे समाजातील प्रत्येक घटकाचे काम आहे. यावेळी डॉ. आशुतोष दिवाण, ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी, सावली केअर सेंटरचे डॉ. किशोर देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. परिसंवादाचे सूत्रसंचालन सोनाली नवांगुळ व राजेश पाटील यांनी केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

8 MAR 2018 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**उपस्थितीचे आवाहन :** मार्गदर्शनपर व्याख्याने, महोत्सव, खास सवलत उपक्रम

# महिला दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक महिला दिनानिमित्त आज, गुरुवारी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांच्यावतीने महिलांसाठी खास मार्गदर्शनपर व्याख्याने, महोत्सव, खास सवलत असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

महिला आर्थिक विकास महामंडळ, आजीवन अध्यासन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ व कै. शारदाबाई गोविंदराव अध्यासन, यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात लोककला केंद्रात (दीक्षांत समारंभ सभागृह हॉलजवळ) दुपारी १२ वाजता महिला सशक्तीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अनंतराव गोविंदराव कोरगांवकर सामाजिक सेवा संघ आणि कोरगांवकर पेट्रोल पंपच्यावतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सत्कार होणार आहे. उद्यमनगरातील उद्योगपती माधवराव बुधले हॉलमध्ये सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून महापौर स्वाती यवलुजे व संयोगीताराजे उपस्थित असतील.

वीर कक्कया विद्यालयाच्या पटांगणावर सकिना महिला महोत्सव होणार आहे. सकाळी नऊ वाजता रॅली, मोफत हेल्थ चेकअप कॅम्प, रोजगारविषयक संधीची व्याख्याने, गीतांची मैफल, कॉमेडी शो, रंगपंचमी असे कार्यक्रम आहेत.तसेच फूड व आर्ट फेस्टिव्हलचेही आयोजन केले आहे. त्यासाठी मोफत स्टॉल पुरविले जाणार आहेत. 'सकिना महिला रत्न' हा पुरस्कारही देण्यात येणार आहे.

अक्कमहादेवी महिला मंडळ, साज ग्रुप व भागीरथी महिला संस्था यांच्या विद्यमाने दुपारी तीन वाजता महिला आत्मसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. हे शिबिर वीरशैव महिलांसाठी मोफत आहे.

आत्मसंरक्षणाबरोबरच अडचणींचा सामना कसा करावा याविषयी या शिबिरात मार्गदर्शन करण्यात येणार आहे, तरी महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भागीरथी महिला संस्थेतर्फे करण्यात आले आहे. जिजाई महिला मंचतर्फे दुधाळीतील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील (केएमसी कॉलेज)मधील यशवंत हॉलमध्ये दुपारी ४ वाजता नगसेविका रुपाराणी निकम या 'महिला सबलीकरण आणि वास्तव' या विषयावर मार्गदर्शन करणार असून, महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिजाई महिला मंचच्या अध्यक्षा शैलजा कुसाळे यांनी केले आहे. एस फोर ए चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने उजळाईवाडी येथील एस फोर ए स्कूल ग्राउंडवर गृहदामिनी महोत्सव होणार आहे. दुपारी तीन ते रात्री दहा या वेळेत होणाऱ्या या महोत्सवात महिला उद्योजिकांना व्यासपीठ देण्यात येणार आहे.

8 MAR 2018 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बँकिंगचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोचावे : पी. एन. जोशी

## शिवाजी विद्यापीठात गोडबोले अध्यासनातर्फे कार्यक्रम


**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७: "बँकिंगचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोचणे आवश्यक आहे. सध्याच्या बँकिंग व्यवस्थेत अनेक आव्हाने आहेत. सहकारी, व्यावसायिक तसेच राष्ट्रीयीकृत बँका या सर्वांसमोर स्पर्धात्मकतेबरोबर वाढत्या अनुत्पादित कर्जाचा बोजा ही आव्हाने आहेत, असे मत सारस्वत बँकेचे संचालक पी. एन. जोशी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील (कै.) रा. ना. गोडबोले अध्यासनातर्फे शॉर्टटर्म प्रोग्रामचे उद्‌घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, नाबार्डचे एस. एल. कुंभारे प्रमुख उपस्थित होते.

श्री. जोशी म्हणाले, "भारतीय रिझर्व्ह बँक, वित्त मंत्रालयाच्या कार्याचीही चिकित्सा होणे आवश्यक आहे. त्यासाठी बँकिंग व्यवस्थेतील ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोचणे आवश्यक आहे. १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर बँकांचे सामाजिक उत्तरदायित्व वाढले. रिझर्व्ह बँकेने प्रथम बँकाचे नियंत्रक म्हणून काम केले; पण त्यानंतर ठेवींवरील विमा, कर्ज व्यवस्थापन, अन्य जबाबदाऱ्यांमुळे रिझर्व्ह बँकही तणावाखाली काम करत असल्याचे जाणवते. वाढत्या अनुत्पादित कर्जांमुळे सार्वजनिक बँकावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत रिझर्व्ह बँक, वित्तमंत्रालयांचीही कार्यप्रणाली विश्वासार्ह यांच्यावर संशय घेतला जात आहे."

डॉ. शिर्के यांनी शिक्षकांना आपले ज्ञान अशा कार्यक्रमातून अद्ययावत करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रा. डॉ. पाटील यांनी एफआरडीआय बिलाबाबत माहिती दिली. या बिलासंदर्भात सरकारचे जाहीर केलेले उद्देश, छुप्या उद्देशांचा सातत्याने विचार व्हावा, असे सांगितले. बँकिंग व्यवस्था ही विश्वासावर चालणारी यंत्रणा आहे. या विश्वासाला तडा जाण्यासारखी परिस्थिती अलीकडच्या काळात निर्माण झाल्याचे ते म्हणाले. डॉ. व्ही. बी. ककडे यांचे आभासी चलन, डॉ. कुंभारे यांचे नाबार्डच्या कार्यपद्धतीबाबत व्याख्यान झाले. समन्वयक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले. डॉ. केदार मारुलकर यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रा. ना. गोडबोले अध्यासनातर्फे शॉर्ट टर्म प्रोग्राममध्ये बोलताना पी. एन. जोशी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

8 MAR 2018
पुढारी

# बँकिंगचे ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक : जोशी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सध्याच्या बँकिंग व्यवस्थेमध्ये अनेक आव्हाने आहेत. सहकारी, व्यावसायिक, तसेच राष्ट्रीयीकृत बँका या सर्वांसमोर स्पर्धात्मक बरोबरच वाढत्या अनुत्पादित कर्जाचा बोजा ही दोन्ही आव्हाने आहेत. भारतीय रिझर्व्ह बँक व वित्त मंत्रालय यांच्या कार्याचीही चिकित्सा होणे आवश्यक आहे. त्यासाठी बँकिंग व्यवस्थेमधील ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे असे मत सारस्वत बँकेचे संचालक पी.एन. जोशी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील कै. रा. ना. गोडबोले अध्यासनाच्या वतीने आयोजित केलेल्या शॉर्टटर्म प्रोग्रॅमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, नाबार्डचे एस. एल. कुंभारे उपस्थित होते.



**कोल्हापूर : कै. रा. ना. गोडबोले अध्यासनाच्या वतीने आयोजित केलेल्या शॉर्टटर्म प्रोग्रॅमध्ये बोलताना पी. एन. जोशी. सोबत डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जे. एफ. पाटील आदी. (छाया : तय्यब अली)**

जोशी म्हणाले, १९६९ मध्ये राष्ट्रीयकरण झाल्यानंतर बँकाचे सामाजिक उत्तरदायित्व वाढले. रिझर्व बँकेने प्रथम बँकांचे नियंत्रक म्हणून काम केले. पण त्यानंतर ठेवींवरील विमा, कर्ज व्यवस्थापन व इतर जबाबदा-या यामुळे रिझर्व्ह बँकसुध्दा तणवाखाली काम करत असल्याचे जाणवते. वाढत्या अनुत्पादित कर्जामुळे सार्वजनिक बँकावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. डॉ. व्ही.बी. ककडे यांचे आभासीचलन या विषयावर तर डॉ. कुंभारे यांचे नाबार्डच्या कार्यपदधतीबाबत व्याख्यान झाले.

प्रा.डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले. डॉ. केदार मारूलकर यांनी सुत्रसंचालन केले.

8 MAR 2018
लोकमत



# साहित्य भान


प्रा. रणधीर शिंदे

# ये कैसा समय है

अब भी स्त्री चौकट में, किसान खेत में, और आदिवासी जंगलों में जूझ रहा हैं. जबकि सत्ताएँ विकास की नशीली गोलियाँ बाँट रही हैं - (अष्टभुजा शुक्ल)

हिंदी वाङ्मयीन नियतकालिकांना अतिशय सकस आणि समृद्ध अशी परंपरा आहे. 'पहल', 'वसुधा', 'धर्मभास्कर', 'आलोचना' जशी महत्त्वाची आहेत, त्याच परंपरेत भारतीय ज्ञानपीठाच्या वतीने प्रसिद्ध होणारा 'नया ज्ञानोदय'चा जानेवारी महिन्याचा विशेषांक 'हमारा काल हमारी कविता' या विषयावर आहे. संपादक आहेत प्रख्यात कवी, समीक्षक लीलाधर मंडलोई. समकालीन भारतीय आणि जागतिक कवितेचा माहोल समजून घ्यायला या अंकाची मोठी मदत होणार आहे.

विश्वकविता विभागात आफ्रिकी, नायजेरियन, मोरक्कन, केरिबियन, चिली, लॅटिन अमेरिकन, मुस्लिम राष्ट्रातील तुर्की, यमन, युनान, इराकी, इराणी, सीरिया तसेच पोलिश, स्पॅनिश, इटालियन, चेक, तर भारतीय उपखंडातील पाकिस्तानी, अफगाण, चिनी, तिबेटमधील कवितांचा समावेश आहे. भारतीय कवितेमध्ये हिंदी कवितांचे दोन भाग व तमीळ, मराठी, आसाम, बंगाल, पंजाबी, कन्नड, गुजरातीबरोबरच संथाली, बुन्देली, मैथिली, माळवा कवितांचा समावेश आहे. याबरोबर विश्वकविता व भारतीय कवितेबद्दलचे समीक्षात्मक लेख आहेत. नामवंत कवी, समीक्षकांचा 'हमारा काल हमारी कविता' या विषयावर परिसंवाद आहे.




अंकातील कवितांमध्ये विश्वसंसाराच्या वर्तमान पिडेबद्दल आणि भविष्याचे दर्शन आहे. सर्वहारा वर्गाच्या पडझडीच्या, संघर्षाच्या करुण महागाथांचा बहुविध स्वर त्यामध्ये गुंफला आहे. 'मैं उनकी तरफ से बोल रहा हूँ जो चले गये है काम पर' या विचारदृष्टीतून अंक निर्माण झाला आहे. स्थानिक जगाच्या कोपऱ्यापासून ते विश्वभरातील कवींचे आवाज त्यामध्ये आहेत. हे सारे बहुआवाज माणूस आणि सृष्टीबद्दल बोलतायत. गेल्या पाव शतकभरात विश्वाची वाटचाल कोणत्या दिशेने होत आहे त्याचा गडद जीवनानुभव या कवितानुभवात आहे. जागतिकीकरण, बाजार, अमानवीयता, पर्यावरण व स्त्रीविषमता, जातविषमतेच्या अपरिमित कहाण्यांनी या कवितांचा प्रदेश व्यापला आहे. सांस्कृतिक भू-विविधता, रचनातत्त्वे, कथन, भाषिक लहेजे, लयींच्या अनोख्या अनवट वाटा त्यामध्ये आहेत. अमेरिकन कवी, अनुवादिका आणि मानव अधिकारासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्या केरोलिन फोर्शे यांची वेगळ्या जीवनभानाची मुलाखतही आहे.

'आज की समूची सृष्टी खतरे मे' या धारणेतून या अंकांची निर्मिती झाली आहे. 'अपनी इच्छा से नहीं हूँ मैं स्त्री', 'राजा सिंहासन पर विराजमान है', 'सब कुछ देखते हुए अब खामोश मत खडे रहो', 'मिटा दिए गए हैं हमारे निशान', 'अजीबो गरीब दौर है यह', 'हम लोग न्यायालय बनाते रहे और शुद्ध अन्याय चारों तरफ पनपता रहा', 'आग की गोले की तरह तप रही थी पृथ्वी', 'हवा बदल रही है', 'मेरा देश अब मुझे कागज से ही पहचानता है.' अंकातील कवितांमधील या ओळी वाचल्यानंतर या कवितांचा नेमका रोख लक्षात येतो.

अंकाचे आणखी वेगळेपण म्हणजे तिसऱ्या जगातील चिमुकल्या गरीब राष्ट्रातील जीवघेणा संघर्ष, राष्ट्रजीवित कथा, साम्राज्यवादी राष्ट्रांची दडपशाही, युद्ध, सांप्रदायिकता, निर्वासितांचे काफिले, अत्याचार, राजकारण, भीती, दहशतीचे आवाज कवितांमधून मुखर झाले आहेत. मराठीतील प्रफुल्ल शिलेदार व कोल्हापुरातील विजय चोरमारे यांच्या कविता या अंकात आहेत. तंत्रज्ञान आणि मानवी संवेदनेच्या बधीर जगाचे दर्शन शिलेदार यांच्या कवितेत आहे, तर वंचित, पीडित जाणिवेचे सूत्र सांगणाऱ्या चोरमारे यांच्या 'खैरलांजी' व 'सरकार' या दोन कविता आहेत. 'क्यों नही करती सरकार आत्महत्या' या उपरोधभावाचा स्वर त्यांच्या कवितेत आहे. 'ये कैसा समय है' असा कालस्वर या बहुस्वरी कवितेतून उलगडला आहे.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत)
kollokmatpratisad@gmail.com